## विशेष दिवाणी दावा क्र. २३७/२०२३ मधील निशाणी क्र. २२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ११ रूल १४ अन्वये प्रतिवादींनी दिनांक २०/०९/२०२२ रोजीचे नोंदणीकृत खरेदी खत क्र. ४२९०/२०२२ चा मुळ दस्त जमा करण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी नि.क्र. २४ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. वादींचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, प्रतिवादींनी दावा मिळकती संदर्भात केलेले दि. २०/०९/२०२२ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत क्र. ४३९०/२०२२ हे बेकायदेशीर असल्याने रद्द झाले आहे असा ठराव करून वादींनी मागितलेला असुन सदरहु खरेदीखत प्रतिवादींच्या ताब्यात असुन त्यांना खरेदीखताचा मुळ दस्त न्यायालयात जमा करण्याबाबत आदेशीत करण्यात यावे.

३. प्रतिवादींचे वि. अधिवक्तता यांनी प्रतिपादन केले की, खरेदीखत झाल्याबाबत वादी व प्रतिवादींनी मान्य केले असुन वादी खरेदीखतावर विसंबुन आहेत. त्यांनी यापुढे असे प्रतिपादन केले की, दि. २०/०९/२०२२ रोजीचे खरेदीखत नव्याने समजल्या बाबत वादींचे प्रकरण नसुन प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीत सदरहु खरेदीखताबाबत उल्लेख केलेला असुन वादी खरेदी खताची प्रमाणीत प्रत दाखल करू शकणार असुन मुळ प्रत दाखल करण्याबाबत या टप्प्यावर अर्ज देवु शकत नाहीत व सदरहु अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन करता व वादी तसेच प्रतिवादींचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, वादींनी सदरहू दावा दि. २०/०९/२०२२ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत क्र. ४३९०/२०२२ हे बेकायदेशीर असल्याने रद्द झाले आहे असा आदेश होण्याकरिता दाखल केलेला आहे. सदरहु खरेदीखताची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल आहे. खरेदीखत झाल्याबाबत प्रतिवादींनी नाकारलेले नसुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या

हिताच्या दृष्टीने सदरहू अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी दि. २०/०९/२०२२ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत क्र. ४३९०/२०२२ दाखल करावे.

sd/-

पनवेल
दिनांक २१/०८/२०२५.

(ए.एस. बडगुजर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल